| फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०४/२०२४ मधील निशाणी क्र.१७ खालील आदेश (मुस्कान जोहेब शेख व इतर विरुध्द जोहेब सलीम शेख) | MHAH150019632024 |
| --- | --- |

सदरचा अर्ज सामनेवाले याने त्याच्याविरूध्द अर्जात झालेला "विनाम्हणणे" चा आदेश रद्द होवून म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत सामनेवाले याने शपथपत्र जोडलेले आहे.

२. सामनेवाले याने सदर अर्जात कथन केले आहे की, सामनेवाला याच्याविरूध्द मा. न्यायालयात दोन प्रकरणे चालू आहेत. पुर्वीचे विधीज्ञ यांनी अर्जदार यांना प्रकरणाबाबत योग्य ती माहिती व तारखांबाबत न कळवल्यामुळे सामनेवाला हा आपले लेखी म्हणणे वेळोत दाखल करू शकला नाही. त्यामुळे त्याच्याविरुध्द दिनांक ३०.०९.२०२५ रोजी विनाम्हणणे आदेश पारीत करण्यात आला आहे. सामनेवाला याचे म्हणणे दाखल न झाल्यास कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. सबब, सामनेवाले याच्याविरूध्द झालेला "विनाम्हणणे" आदेश रद्द होवून त्याचे म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. अर्जदाराने निशाणी क्र. १८ वर सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, अर्जातील कथन हे खोटे व लबाडीचे असून ते अर्जदारास मान्य नाही. वास्तविकपणे सामनेवाला हा दिनांक ०९.०६.२०२५ रोजी हजर झालेला असतांना सामनेवाला याची सदर अर्जामध्ये म्हणणे देण्याची नैतीक जबाबदारी होती. परंतु, सामनेवाला याने अर्जदारास त्रास देण्याच्या उद्देशाने जाणुनबुजून म्हणणे दाखल केले नाही. सदर प्रकरणामध्ये निकाल होणार याची खात्री झाली म्हणून सामनेवाला याने उशिराने अर्ज दाखल करून म्हणणे दाखल केले आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित मंजूर केला तर जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. सामनेवाला हा दिनांक ०९.०६.२०२५

रोजी अर्जात हजर झाला व त्यानंतर पुरेशी संधी देवून देखील त्याने मुदतीत म्हणणे दाखल केले नाही. त्यास सामनेवाला याने पुर्वीच्या त्याच्या विधीज्ञांनी प्रकरणाबाबत व तारखांबाबत न कळवल्यामुळे मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही असे कारण नमुद केले आहे. परंतु, सदर कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. प्रस्तुत अर्जात म्हणणे दाखल करण्यास झालेल्या उशिराबाबत सामनेवाला याने दिलेले कारण संयुक्तीक नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत अर्ज हा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १४४ अन्वये पोटगी मिळण्याकरिता दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज पुर्णतः गुणदोषावर निकाली काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार सामनेवाले याला त्याचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये सामनेवाला याच्याविरुध्द दिनांक ३०.०९.२०२५ रोजी विनाम्हणणे चा आदेश पारीत झाल्यानंतर अर्जदाराने पुरावा देवून दिनांक १४.०२.२०२६ रोजी पुरावा बंद केलेला आहे. त्यानंतर प्रकरण अंतीम युक्तीवादाकरीता असतांना सामनेवाला याने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. यावरून असे दिसते की, सामनेवाला यास प्रस्तुत प्रकरणाची संपूर्ण माहिती असतांना देखील त्याने केवळ प्रकरण लांबविण्याकरीता जाणिवपुर्वक उशिर केलेला आहे. त्याकरीता सामनेवाला यास जास्तीत जास्त दंड आकारणे योग्य व रास्त ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सामनेवाला याच्याविरुध्द अर्जात झालेला "विनाम्हणणे" आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. सामनेवाले याने अर्जदाराला दंडापोटी रक्कम रुपये २५००/- (रक्कम रुपये दोन हजार पाचशे फक्त) द्यावेत. तद्नंतर सामनेवाले याचे म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

३. सामनेवाला याने वरीलप्रमाणे आदेशाची पुर्तता पुढील तारीख किंवा तत्पुर्वी न केल्यास सदरचा रद्द समजण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.03.24 17:45:47 +0530

**(संध्या यु. सुळ)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश,

क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा

दिनांक – २४/०३/२०२६